# कौटुंबिक न्यायालय, पुणे

## कार्यालयीन आदेश क्र. आस्था/२०१/२०२१

संदर्भ :१) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाने निर्देशित केलेली दिनांक १६/०४/२०२१ व २९/०७/२०२१ रोजीची मानक कार्य प्रणाली.

२) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे पत्र जा. क्र. इंन्स्पे-१/४०/२०२१, दिनांक १०/०६/२०२१

३) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे परिपत्रक दिनांक ०९/०६/२०२१

४) पुणे महानगर पालिकेचे पत्र क्र. एचओ/३७३४, दिनांक २१/०६/२०२१

## कार्यालयीन आदेश

प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे न्यायालयीन कामकाजाबाबत खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहेत,

ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भ क्र. ०१ वरील परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या निर्देशानुसार दिनांक ०२/०८/२०२१ पासून पुढील आदेश होईपर्यंत या कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व न्यायालये एका सत्रामध्ये सुरु राहतील. न्यायालयीन कामाकाजची वेळ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा. पर्यंत राहील व कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वा. पर्यंत राहील.

या कार्यालयाच्या आस्थापनेवर सध्या कार्यरत असलेले सर्व न्यायिक अधिकारी, विवाह समुपदेशक व कर्मचारी यांची उपस्थिती दररोज १००% राहील. सर्व कर्मचा-यांनी रोज कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी कार्यालयात हजर राहून प्रलंबित कामांचा त्वरीत निपटारा करावा.

या कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व न्यायालये व कार्यालये पुढील आदेश होईपर्यंत दर शनिवारी बंद राहतील. त्यामुळे दिनांक १४/०८/२०२१ रोजी ऐवजीच्या कार्यदिनाबाबत यथावकाश आदेश निर्गमित करण्यात येतील.

अपावादात्मक परिस्थिती वगळता, सर्व कर्मचा-यांनी लेखी पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये तसेच पूर्व मंजूरी शिवाय रजेवर जाऊ नये.

पहारेकरी कर्मचा-यांनी यापूर्वी त्यांना नेमून दिल्याप्रमाणे त्यांचे कार्यालयीन कर्तव्य पार पाडावयाचे आहे.

ना. उच्च न्यायालय, मुंबई तसेच महाराष्ट्र शासनाने शिष्टाचाराविषयी वेळोवेळी दिलेल्या कोरोना प्रतिबंधक निर्देशांचे तंतोतंत पालन करावे.

संबंधितांना त्याप्रमाणे कळविण्यात यावे.

सही/-
(सुभाष रं. काफरे)
प्रमुख न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, पुणे.

पुणे
दिनांक : ३०/०७/२०२१

प्रत माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित :-

०१) मा. प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे
०२) मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय क्र. २, पुणे
०३) मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय क्र. ३, पुणे
०४) मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय क्र. ४, पुणे
०५) मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय क्र. ५, पुणे
०६) न्यायालय व्यवस्थापक, कौटुंबिक न्यायालय, पुणे
०७) वरिष्ठ विवाह समुपदेशक, कौटुंबिक न्यायालय, पुणे
०८) प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, पुणे
०९) उपप्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, पुणे
१०) अधिक्षक, नाझर कार्यालय, कौटुंबिक न्यायालय, पुणे
११) अधिक्षक, नक्कल व अभिलेख शाखा, कौटुंबिक न्यायालय, पुणे
१२) अधिक्षक, गृहशाखा, कौटुंबिक न्यायालय, पुणे
१३) अधिक्षक, दाखल विभाग, कौटुंबिक न्यायालय, पुणे
१४) शिरस्तेदार, कौटुंबिक न्यायालय क्र. १, पुणे
१५) शिरस्तेदार, कौटुंबिक न्यायालय क्र. २, पुणे
१६) शिरस्तेदार, कौटुंबिक न्यायालय क्र. ३, पुणे
१७) शिरस्तेदार, कौटुंबिक न्यायालय क्र. ४, पुणे
१८) शिरस्तेदार, कौटुंबिक न्यायालय क्र. ५, पुणे
१९) संगणक विभाग, कौटुंबिक न्यायालय, पुणे
२०) सेवापुस्तक विभाग, कौटुंबिक न्यायालय, पुणे
२१) बेलिफ विभाग, कौटुंबिक न्यायालय, पुणे

हुकूमावरुन,
30/07/2021
प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, पुणे.

पुणे
दिनांक : ३०/०७/२०२१